# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक १९/०९/२०१६**

**सायं ४.३० वा.**

<table>
<tr><th>अनु. क्र.</th><th>विषयाचे नाव</th><th>मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय</th></tr>
<tr><td>१</td><td>मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १९/०८/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.</td><td>ठराव :- मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १९/०८/२०१६ रोजीचे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेंत येत आहेत.<br>अनुमोदक :- (रूपेश जाधव) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)</td></tr>
<tr><td>२</td><td>प्रश्नोत्तरे</td><td><table>
<tr><td>१९/९/२०१६</td><td>मा. श्री. धनंजय गावडे</td><td>माहे एप्रिल २०१६ ते जुलै २०१६ कालावधीतील जमा/खर्चाची माहिती (उदा. जमेच्या बाजु उदा. मालमत्ता कर, जाहिरात कर, L.B.T. अनुदान, नगररचना विकास शुल्क, गाळे हस्तांतरण, परिवहन उपक्रम) तसेच खर्चाच्या बाजु उदा. साफसफाई, दिवाबत्ती, रूग्णाल व्यवस्थापन, उद्याने, पीबजेट, जेंडर बजेट, पाणीपुरवठा, परिवहन उपक्रम, औषध खरेदी, शिक्षण खर्च, महसुल खर्च इ.</td><td>मा. मुख्य लेखा परिक्षक (कोळेकर) दि. ३०/०८/२०१६</td></tr>
<tr><td>१९/९/२०१६</td><td>मा. श्री. सुदेश चौधरी</td><td>वसई-विरार कार्यक्षेत्रात विविध रस्ते, चौका नागरी वस्त्यांना देण्यांत आलेली नावे पारीत केलेले ठराव, शासनाचे मार्गदर्शन/निर्देश तसेच विनापरवाना अशा नावे या विरोधात महानगरपालिकेने केलेली कारवाई</td><td>मा. कार्यकारी अभियंता (लाड) दि. १२/९/२०१६</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>३</td><td>शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव</td><td>ठराव :-<br>१ महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. स्वमअ-२०१६/प्र.क्र.१३९/नवि ३४ दिनांक २३/०८/२०१६<br>२ महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय स्थासं क्र. -२०१५/प्र.क्र.१३५/२०१५ नवि ३२ दिनांक ०२/०९/२०१६</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| ४ | श्री. जितेश मंगा गोहिल यांना लाड समिती शिफारसी नुसार महानगरपालिका सेवेत सफाई कामगार या पदावर सामावून घेणेबाबत. | **निर्णय/ठराव:-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई येथील कर्मचारी श्रीमती कांता मंगा गोहील या नियत वयोमानानुसार दिनांक ३०/०४/२०१६ रोजी महानगरपालिका सेवेतून सेवानिवृत्त झाले असुन त्यांचा मुलगा श्री. जितेश मंगा गोहील (वय ३४ वर्षे ०२ महिने) हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोबर, २०११, शासन परिपत्रक दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च, २०१६ मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :-(वृंदेश पाटील) सुचक :- ( फ्रान्सिस डिसोजा (आपटे)** |
| ५ | कु. दिपिका हेमंत मांडे यांना लाड समिती शिफारसी नुसार महानगरपालिका सेवेत सफाई कामगार या पदावर सामावून घेणेबाबत. | **निर्णय/ठराव:-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई येथील कर्मचारी श्री.हेमंत दत्तात्रेय मांडे हे नियत वयोमानानुसार दिनांक २९/०२/२०१६ रोजी महानगरपालिका सेवेतून सेवानिवृत्त झाले असुन त्यांची मुलगी कु.दिपाली हेमंत मांडे, (वय २९ वर्षे ०९ महिने) या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोबर, २०११, शासन परिपत्रक दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च, २०१६ मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :-(वृंदेश पाटील) सुचक :- ( फ्रान्सिस डिसोजा (आपटे)** |
| ६ | पंतप्रधान आवास योजना अंतर्गत प्रकल्पाची अंमलबजावणी करणे, योजनेची (IEC) प्रसिद्धी देणे, सर्व्हेक्षण करणे, विस्तृत प्रकल्प अहवाल बनविणे व गुण नियंत्रण ठेवणेकामी प्रकल्प सल्लागाराची नियुक्ती करणे, निविदा प्रक्रिया करणे तसेच तांत्रिक कक्ष स्थापन करणेबाबत. | **निर्णय :-** सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली. महानगरपालिका हद्दिमध्ये पंतप्रधान आवास योजनेची अंमलबजावणीकामी आवश्यक कार्यवाही करण्यास ही सभा मंजुरी देत असून सभेतील चर्चा, सदस्यांचे मत व सुचना लक्षात घेवून योजनेबाबत आवश्यक वेळी महासभेस वा स्थायी समितीस अवगत करावे. सभे दरम्यान झोपडपट्टी क्षेत्रांची यादी सर्व सदस्यांना उपलब्ध करुन दिली असून सदर यादीमध्ये सन्मा. सदस्यांनी काही बदल सुचविल्यास पाहणीअंती प्रशासनाकडून तसे बदल करुन घेण्यास देखिल आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :-(पांडूरंग इंगळे) सुचक :- ( फ्रान्सिस डिसोजा (आपटे)** |
| ७ | सन २०१६/१७ च्या अर्थसंकल्पिय अंदाजपत्रातील पाणी पुरवठा विभागाच्या तरतुदीच्या पुर्नविनियोजनास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव/निर्णय :- उपरोक्त विषयी सविस्तर चर्चा होऊन असे ठरविण्यांत आले की, १. " सुर्या योजना देखभाल दुरुस्ती "** रु. २.५० कोटी व २. **" उसगांव योजना देखभाल दुरुस्ती "** रु. १.०० कोटी असे एकुण रु.३.५० कोटी इतकी तरतूद कमी पडत असल्याने कमी पडत असलेली तरतूद "विकास निधी मधुन पाणी पुरवठा शहरांतर्गत जलवाहीनी व्यवस्था " या लेखाशिर्षा वरील उपलब्ध तरतूद मधून **"महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ अन्वये रक्कम रकमी करणे व अन्य शिर्षावर वर्ग करणे "** या कलमान्वये **"महाराट्र नगरपरिषदा लेखा संहिता १९७१ चे नियम ३० अन्वये"** पुर्नविनियोजनास मंजूरी देण्यात येत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | **अनुमोदक :-(मिलिंद घरत)** **सुचक :- ( फ्रान्सिस डिसोजा (आपटे)** |
| ८ | गोखिवरे येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पावरील जळालेल्या शेड व भंगार साहित्य हलविणे कामी अनामत रक्कम परत करणे कामी श्री. युनुस पठाण (बाबा ट्रेडींग कं.) ह्यांच्या आलेल्या अर्जावर विचारविनिमय करून निर्णय घेणे. | **ठराव :-** उपरोक्त सादर केलेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली त्यातील सदस्यांचे मत व सुचना लक्षात घेऊन सदर प्रकरणी विधी विभागाकडून सर्व कायदेशीर बाबीं तपासुन घेण्यास व नियमानुसार कार्यवाही करून रक्कम रुपये २५,००,०००/- (अक्षरी पंचवीस लाख रु. मात्र) श्री. युनूस पठाण (बाबा ट्रेडींग कंपनी) यांना अदा करणेकामी आजची सभा मा. आयुक्त यांना अधिकार प्रदान करीत आहे.<br>**अनुमोदक :-(कन्हैय्या भोईर)** **सुचक :- ( फ्रान्सिस डिसोजा (आपटे)** |
| ९ | घनकचरा व्यवस्थापनांतर्गत दैनंदिन रस्ता सफाई, गटार सफाई, कचरा संकलन करणे विकेंद्रीकरण करणे क्षेपनभुमीवर वाहतुक करणे. त्रैवार्षिक निविदा प्रक्रियेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेबाबत विचारविनिमय करून निर्णय घेणे. | **निर्णय :-** उपरोक्त सादर केलेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली त्यातील सदस्यांचे मत व सुचना लक्षात घेऊन मंजुरीसाठी सादर केलेला अहवाल त्रोटक स्वरुपाचा असल्याने प्रशासनाकडून प्रस्तावात आवश्यक ते बदल करावे व सर्वसमावेशक सविस्तर प्रस्ताव सादर करावा. सबब, तुर्तास सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यास व सर्वसमावेशक प्रस्ताव पुढील सभेत सादर करावा. अशी आजची सर्वसाधारण सभा ठरवित आहे.<br>**अनुमोदक :-(सुनिल आचोळकर)** **सुचक :- ( फ्रान्सिस डिसोजा (आपटे)** |
| १० | स.नं. ३७६ (भाग) ३९२ भाग विरार बोळींज येथील गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा) गृहनिर्माण योजनेंतर्गत तयार करण्यांत आलेल्या स्ट्रॉम वॉटर ड्रेनेज, रस्ते व जलवाहिन्या महापालिकेकडे हस्तांतरीत करण्यास मंजुरी मिळणेबाबत. | **निर्णय :-** सादर केलेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली त्यातील सदस्याचे मत व सुचना लक्षात घेऊन स.नं. ३७६ (भाग) ३९२ भाग विरार बोळींज येथील गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा) गृहनिर्माण योजनेंतर्गत स्ट्रॉम वॉटर ड्रेनेज, रस्ते व जलवाहिन्या, रस्ते अपुर्ण अव्यवस्थेत आहेत. सबब, म्हाडाकडील विषयांकित योजना संपूर्ण कार्यान्वित झाल्यानंतर सर्वेक्षण करून महापालिकेकडे हस्तांतरीत करणेबाबतचा प्रस्ताव सभेत फेर सादर करण्यात यावा व तुर्तास उपरोक्त प्रस्ताव स्थगित ठेवणेस ही सभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :-(सखाराम महाडिक)** **सुचक :- ( फ्रान्सिस डिसोजा (आपटे)** |
| ११ | वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अनावश्यक स्पीड ब्रेकर्स (गतीरोधक) काढणे व नॉर्म्सप्रमाणे नविन बसविणे कामी निर्णय घेणे. | **निर्णय :-** सादर केलेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली सदर प्रकरणी आवश्यक व अनावश्यक स्पीड ब्रेकर्स (गतीरोधक) काढणे, नॉर्म्सप्रमाणे नविन स्पीड ब्रेकर्स (गतीरोधक) बसविणे कामी प्रशासनाने नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी असे ही सभा ठरवित आहे.<br>**अनुमोदक :-(प्रकाश रॉड्रिक्स)** **सुचक :- ( फ्रान्सिस डिसोजा (आपटे)** |
| १२ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा मा. सर्वसाधारण सभेमध्ये घेणेबाबत. | **प्रस्तावाचा निर्णय :-** वरील प्रस्तावात अवगत केल्यानुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) या महत्वाकांक्षी योजनेची महापालिकेच्या कार्यक्षेत्रात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने केलेल्या उपाययोजना व प्रस्तावीत उपाययोजनांना ही सभा मान्यता प्रदान करीत आहे.<br>**अनुमोदक :-(नरेंद्र पाटील)** **सुचक :- ( फ्रान्सिस डिसोजा (आपटे)** |